# कोरोनाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

**सौरभ संजय पाटील**. भौतिकशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

sourabhpatil21198@gmail.com

……………………………………………………………………………………..

**प्रस्तावना**

जागतिकीकरणाचे फलीत म्हणजे अनेक देशांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध झाली. मागील काही वर्षामध्ये भारतीय अर्थव्यवस्था अतिशय वेगाने उभारी घेत आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे, त्यामुळे शेतीवरील संकटाचा सरळ परिणाम अर्थव्यवस्थेवर होतो. भारत हा गुंतवणुकीसाठी सर्वात चांगली बाजारपेठ बनली आहे. पण आज कोरोना महामारीने रौद्ररूप धारण केले आहे. कोरोना साथीचा फैलाव रोखण्यासाठी अनेक देशांनी 'टाळेबंदीचा' पर्याय स्वीकारला. भारतानेही टाळेबंदीचा पर्याय स्वीकारला, २५ मार्च २०२०पासून संपूर्ण भारतात सरकारने टाळेबंदी केली आहे. या टाळेबंदीमुळे अनेक उद्योगधंदे ठप्प झाले, लाखो लोकांचा रोजगार गेला. आणि पर्यायाने विकास ठप्प झाला. या टाळेबंदीचा मोठा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झाला आहे,आणि भविष्यात देखील याचा खूप मोठा दुरगामी परिणाम अर्थव्यवस्थेवर होणार आहे.

**विषय विवेचन**

आर्थिक वर्ष २०१९—२०चा जीडीपीचा दर ४.२ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. त्याआधीच्या वर्षात तो ६.१टक्के नोंदवण्यात आला होता. वर्ष २००९ मध्ये आलेल्या जागतिक वित्तीय संकटानंतरचा सर्वात नीचांकी विकासदर भारताने नोंदवला आहे.

विविध संस्थांचा २०२०—२१साठी जीडीपीचा अंदाज टक्क्यांमध्ये[१]

| | |
|---|---|
| एसबीआय | (—)६.८ |
| फिंच रेटिंग | (—)५ |
| आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ) | १.२ |
| जागतिक बँक | १.५ते २.८ |
| आयसीआरए | (—)१ |

भारतातील टाळेबंदीमुळे नुकत्याच संपलेल्या २०१९—२०या आर्थिक वर्षात भारतातील थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) ८३ अब्ज अमेरिकन डॉलरच्या तुलनेत , २३ टक्क्यांनी घसरून ६४ अब्ज अमेरिकन डॉलरपर्यंत येण्याचा जागतिक बँकेचा अंदाज आहे.[२] काही विश्लेषकांच्या मते आर्थिक वर्ष २०२१मध्ये वित्तीय तूट १६ लाख कोटी असू शकते. व ती जीडीपीच्या आठ टक्के इतकी असेल.[३] टीआरए रिसर्चचा सर्वेक्षणाचा अहवाल नुकताच प्रकाशित झाला. त्यानुसार आर्थिक स्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी सरासरी १६.५ महिने लागतील. तसेच संपूर्ण आरोग्य व्यवस्था सुरळीत होण्यासाठी ३.८ महिने लागतील.[४] एका अंदाजाप्रमाणे भारताचे दर दिवशी कोरोना पूर्व एकूण उत्पादन आठ अब्ज डॉलर्स म्हणजेच ८०० कोटी डॉलर होते. टाळेबंदीच्या काळात टिकाऊ , अर्ध टिकाऊ वस्तूंची मागणी (११टक्के हिस्सा) उपयोग्य वस्तूंची मागणी ( ३४ टक्के हिस्सा) व सेवांची मागणी(५०टक्के हिस्सा) लक्षणीय घट होऊन उपयोग खर्चात ढोबळमानाने ३५ टक्के घट होण्याचा अंदाज आहे. याचबरोबर जीवितहानी व आरोग्य व्यवस्थेवर खर्च यांचा अंदाज करणे कठीण आहे. उपयोग्य वस्तू व सेवांची मागणी धरून १३५० कोटी डॉलरचे नुकसान होईल, असे मत व्यक्त करण्यात आलेले आहे.[५]

सूक्ष्म लहान व मध्यम उद्योगधंदे (एमएसएमई) देशभर पसरलेले आहेत, त्यापैकी ५१ टक्के उद्योगधंदे ग्रामीण भागात आहेत व त्यांनी ११ कोटी लोकांना रोजगार पुरवला आहे.९९.५टक्के लघुउद्योग शहरात व ग्रामीण भागात आहेत. स्मॉल व मीडियम उद्योगधंदे ०.५टक्के आहेत, त्यांनी पाच कोटी लोकांना रोजगार पुरवला आहे, त्यातील २०टक्के उद्योग महिला ८०

टक्के उद्योग पुरुष चालवतात. त्या सर्व उद्योगांवर टाळेबंदीचा दूरगामी परिणाम झालेला आहे.[६] कोरोना व्हायरस संसर्गामुळे अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम झाला आहे. यामध्ये भारतात १३.५ कोटी लोकांच्या नोकऱ्या धोक्यात येऊ शकतात. व १२ कोटी लोक गरिबीच्या खाईत लोटले जाऊ शकतात, असे मत सल्लागार कंपनी आर्थर डी लिटिल यांच्या अहवालात व्यक्त करण्यात आले आहे.[७] आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने कोरोना आणि राष्ट्रीय टाळेबंदीमुळे भारताच्या असंघटित क्षेत्रातील ४० कोटी कष्टकरी बेरोजगार होणार असल्याचे म्हटले आहे.[८] टाळेबंदीमुळे बँकांची थकीत कर्जे (एनपीए) दुप्पट होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.'रॉयटर्स' वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार बँकांच्या एकूण कर्जवाटपपैकी सप्टेंबर २०१९ अखेर तब्बल ९. ३५ लाख कोटी रुपये कर्ज थकीत आहेत. बँकांच्या एकूण मालमत्तेच्या तुलनेत हे प्रमाण ९.१ टक्के आहे. देशातील बेरोजगारी दर ३ मे रोजी संपलेल्या आठवड्यात२७.१ टक्क्यांवर पोहोचला होता. त्या आधीच्या तो २१.१आठवड्यातटक्के होता.[९]

सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स (सियाम) नुसार गेल्या वर्षीच्या मार्च तुलनेत यंदा प्रवासी वाहनांच्या विक्रीत ५१ टक्क्यांनी घट झाली आहे. गेल्या २२ वर्षातील सर्वात मोठी घसरण आहे. भारतीय वाहन उद्योग हा जगातील चौथा सर्वात मोठा उद्योग समजला जातो. भारतीय दुचाकी उद्योग तर जगात सर्वात मोठा आहे. व्यावसायिक वाहने आणि ट्रॅक्टर उत्पादनातही भारताचे आघाडीचे स्थान आहे. संपूर्ण भारतीय वाहन उद्योगाची वार्षिक उलाढाल १०० अब्ज डॉलर असून यात ३ कोटी २० लाख कर्मचारी सामावलेले आहेत. देशाच्या उत्पादन जीडीपीमध्ये या उद्योगाचा वाटा सुमारे ५० टक्के आहे. उद्योगाच्या जीडीपीमध्ये २६ टक्के, तर एकूण जीडीपीमध्ये ७.१ टक्के आहे. देशाच्या उत्पादन शुल्करुपी महसूलात उद्योगाचे योगदान १३टक्केआहे. विविध वाहन उत्पादक कंपन्या आणि सुटे भाग पुरवणाऱ्या कंपन्यांचे प्रकल्प बंद असल्याने दर दिवशी अंदाजे २३०० कोटी रुपयांहून अधिक महसूली तोटा होत आहे, असा सीयामचा अंदाज आहे.[१०] कोरोनाच्या पार्श्वभूमीवर केलेल्या टाळेबंदीमुळे साखर मागणीत मोठी घट होईल असा अंदाज व्यक्त करण्यात आलेला आहे. देशपातळीवर २० लाख टनांनी साखरेचा खप कमी होईल. तर निर्यात १२ लाख टनांनी कमी होईल.[११]

भारत देशातील आठ महानगरांमध्ये जवळपास ६.५ लाख घरे अद्याप विक्रीविना पडून आहेत. देशातील ८ महानगरात १५लाख घरांचे बांधकाम सुरू आहे. या सर्वांवर टाळेबंदीचा खूप मोठा परिणाम होत आहे.[१२] कोरोना व्हायरस संकटामुळे बाजारातून घर खरेदीदार दिसेनासे झाले आहेत. अहवालातील माहितीनुसार जानेवारी ते मार्च २०२०या कालावधीत २७ हजार ४५१ घरांची विक्री झाली होती, तर २०१९ झाली याच सुमारास ३८ हजार ६२८ घरांची विक्री झाली होती. साल २०२०च्या पहिल्या तीन महिन्यांमध्ये देशात घरांच्या विक्रीत २९ टक्के घट झाली आहे.[१३] देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये ९ टक्के योगदान रत्नआभूषण उद्योगचे(दागदागिने) आहे.टाळेबंदीमुळेहा उद्योग पूर्णपणे ठप्प झाला आहे. भारतात दरवर्षी सुमारे ८५० टन सोन्याची मागणी असते. टाळेबंदीमुळे २०२० साली ही मागणी ३० टक्के घटून ६९० टनांवर येईल, असा अंदाज इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स (आयसीसीने) व्यक्त केला आहे. या क्षेत्रात सुमारे ५०लाख लोक कार्यरत आहेत. त्यामुळे या महामारीचा खूप मोठा फटका या मजुरांना बसलेला आहे.[१४]

**सारांश**

आर्थिक वर्ष २०१९—२०चा जीडीपीचा दर ४.२ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. थेट परकीय गुंतवणूक २३ टक्क्यांनी घसरून ६४ अब्ज अमेरिकन डॉलरपर्यंत येण्याचा जागतिक बँकेचा अंदाज आहे. उपयोग्य वस्तू व सेवांची मागणी धरून १३५० कोटी डॉलरचे नुकसान होईल असे मत व्यक्त करण्यात आलेले आहे. टाळेबंदीमुळे भारतात १३.५ कोटी लोकांच्या नोकऱ्या धोक्यात येऊ शकतात, व १२ कोटी लोक गरिबीच्या खाईत लोटले जाऊ शकतात असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. बँकांची थकीत कर्जे दुप्पट होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विविध वाहन उत्पादक कंपन्या आणि सुटे भाग पुरवणाऱ्या कंपन्यांचे प्रकल्प बंद असल्याने दर दिवशी अंदाजे २३०० कोटी रुपयांहून अधिक महसूली तोटा होत आहे, असा

सीयामचा अंदाज आहे. साखरेची निर्यात १२ लाख टनांनी कमी होईल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. साल २०२० च्या पहिल्या तीन महिन्यांमध्ये देशात घरांच्या विक्रीत २९ टक्के घट झाली आहे. सोन्याची मागणी ३०टक्क्याने घटणार आहे.

**संदर्भसूची**

१.दैनिकसकाळ३०—०५—२०२० पृ.१०
२.दैनिकलोकमत २९—०४—२०२०पृ.०७
३.दैनिकपुण्यनगरी १८—०५—२०२० पृ.०२
४.कित्ता
५.दैनिकलोकमत १०—०४—२०२० पृ.०६
६.दैनिकपुढारी १६—०५—२०२० पृ.०४
७.दैनिकपुण्यनगरी १९—०५—२०२०पृ.०२
८.दैनिकसकाळ १३—०४—२०२०पृ.०४
९.दैनिकसकाळ ०५—०५—२०२० पृ.०१
१०.दैनिकसकाळ २९—०४—२०२० पृ.०८
११.दैनिकपुढारी १८—०५—२०२० पृ.०४
१२.दैनिकसकाळ २८—०४—२०२० पृ.०८
१३.दैनिकपुण्यनगरी ०९—०४—२०२० पृ.११
१४.दैनिकपुण्यनगरी ११—०४—२०२०पृ.११